# नवे बालशिक्षण, नवे व्यवस्थापन

बालशिक्षण हा, आजच्या प्रगत जगात, भावी समाज निर्मितीचा पाया मानला जातो. आजच्या पालकांमधूनच उद्याचा प्रौढ समाज जन्म घेत असतो; आणि यामुळेच, भावी कालातील समाजाचे स्वरूप, हे आजच्या लहान मुलांना, समाजातील प्रौढ व्यक्ती कशा तऱ्हेची वागणूक देत असतात, आपापल्या घरी आणि आपापल्या शाळांमध्ये कशा तऱ्हेचे अनुभव मुलांना, त्यांच्या दैनंदिन जीवनात प्राप्त होतात, यांवर प्रकर्षाने अवलंबून असते. लहान वयात आणि विशेषतः आठ वर्षांपर्यंतच्या वयात बालकांच्या मेंदूचा विकास झपाट्याने होत असतो. मेंदूचा आकार, मेंदूचे वजन आणि मेंदूमध्ये जन्मजात असलेल्या चेतापेशींच्या परस्परांमध्ये होणाऱ्या जोडण्यांची संख्या वेगाने वाढत जाण्याचा हा कालावधी असतो. अशाप्रकारे होणाऱ्या मेंदूच्या विकासावरच बालकांची जडण-घडण अवलंबून असते. ही जडणघडण संतुलित स्वरूपांत होणे हे सर्वस्वी याच वयात विकसित होत जाणाऱ्या, बालकाच्या विविधांगी क्षमतांच्या वयानुरूप होणाऱ्या विकासपथांनी निश्चित होत असते. बालकाचा शारीरिक विकास, बौद्धिक व भावनिक विकास, भाषिक व सामाजिक विकास घडून येण्याचा, हा अतिशय संवेदनशील असा आणि प्रौढांनी ज्याची काळजी करावी आणि काळजी घ्यावी असा, मानवी जीवनातील मूलभूत महत्त्वाचा कालावधी असतो. या वयात बालकांकडे, त्यांच्या वाढीच्या गरजांकडे, दुर्लक्ष होणे, याचे घातक परिणाम, मुलांच्या मेंदू विकासावर होऊन, मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य कायमस्वरुपी धोक्यात येऊ शकते. याउलट, मुलांची प्रेमाने जपणूक आणि क्षमता विकास अनुभवांची साठवणूक त्यांच्या मेंदूमध्ये होत गेली तर, त्यांच्या आयुष्यभराची यथायोग्य गुंतवणूक होऊ शकते. आजपर्यंत विकसित होत गेलेले बालशिक्षणाचे शास्त्र हे अशा प्रकारच्या गोष्टींची दखल घेऊन, बालकांना मेंदुपूरक ठरणाऱ्या अनुभवांची मांडणी करणारे शास्त्र म्हणून पुढे आलेले आहे.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मॉन्टेसरीबाईंनी, इटली देशामध्ये शास्त्रीय बालशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. १९१२ साली, त्यांचा शास्त्रीय पद्धती मांडणारा ग्रंथही इंग्रजीत अनुवादित होऊन प्रकाशित झाला. या ग्रंथाच्या वाचनाने, भावनगर, गुजरात मधील काही मंडळी प्रभावित झाली. गिजूभाई बधेका हे त्यांपैकीच एक. त्यांनी आपला वकिली पेशा सोडून १९२० साली, भावनगर येथे पहिले बालमंदिर सुरू केले. त्याला यंदा शंभर वर्षे पूर्ण झाली. गिजू भाई बधेका व त्यांच्या सहकारी ताराबाई मोडक यांनी गुजरात व महाराष्ट्रात शिक्षण शास्त्रांतील प्रयोग, प्रसार, प्रशिक्षणे, प्रकाशने अशा विविध प्रकारांनी शिक्षणाला सामाजिक महत्त्व प्राप्त करून देण्याचे कार्य केले. ताराबाई मोडक यांनी अनुताई वाघ यांना सहाय्याला घेऊन, बालशिक्षणाचे शास्त्रीय प्रयोग थेट आदिवासी मुलांपर्यंत पोचविले. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक शिक्षणविषयक समित्या, आयोग यांनी बालशिक्षणाचे महत्त्व व गरज प्रकर्षाने मांडूनही, शासनाच्या स्तरावर बाल शिक्षणाचे धोरण अस्तित्वात येऊ शकले नाही. १९७२ सालापासून अंगणवाड्यांची योजना, प्रामुख्याने खेड्यांमधून केंद्रसरकारने सुरू केली. आजमितीस देशात सुमारे साडेतेरा लाख अंगणवाड्या चालू आहेत. महाराष्ट्रात सुमारे दीड लाख अंगणवाड्या

असून, त्या सुमारे ५० लाख मुलांपर्यंत आरोग्य सेवा पुरवितात. असे असले तरी, अंगणवाडीतून बालशिक्षणाचा अंश नगण्यच आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने, 'शैक्षणिक धोरण २०२० यामध्ये, आठवीपर्यंतच्या बालकांना दर्जेदार बालशिक्षण पुरविण्याची तरतूद करून, प्रथमतःच एक क्रांतिकारक पाऊल पुढे टाकले आहे. त्याचबरोबर, शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत बालशिक्षण आणण्याचा धाडसी पण योग्य असा विचार मांडला आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात (२०२०), बाल शिक्षणाला पायाभूत शिक्षण म्हणून अग्रस्थान देण्यात आले आहे. यापूर्वी बालशिक्षण केवळ वय वर्षे तीन ते सहा यापुरते मर्यादित होते, आता त्याचा दोन दिशांनी विस्तार केला आहे. एक म्हणजे मुलांचे सहा ते आठ हे वय किंवा पहिली व दुसरी या शालेय इयत्ता, पायाभूत बालशिक्षणात समाविष्ट केल्या आहेत; तर दुसरीकडे, जन्मापासून तीन वर्षांपर्यंतचा बालकांचा विकास महत्त्वाचा मानून, त्यालाही अनौपचारिक शिक्षणाचा भाग म्हणून मूलभूत बालशिक्षणात घेण्यात आले आहे. थोडक्यात असे की, बालकांचे मौल्यवान असे मेंदूविकासाचे व क्षमता विकासाचे वय बालशिक्षणाच्या टप्प्यात विचारात घेतले आहे. शैक्षणिक धोरण २०२० मध्ये असे म्हटले आहे की, "संवेदनशीलता, चांगली(समाजयोग्य) वर्तणूक, सभ्यता, नैतिकता, व्यक्तिगत आणि सार्वजनिक स्वच्छता, गटांत काम आणि सहकार" यांचा विकास होणे याचीही जबाबदारी बालशिक्षणाच्या व्यवहारांवर दिली आहे. थोडक्यात असे की, आता बालशिक्षणाचे शास्त्र विचारांत घेऊन, बालशिक्षणाच्या व्यवहाराला वळण द्यायचे आहे.

धोरणे करणे हा बौद्धिक-तार्किक उपक्रम असल्यामुळे तो आदर्शवत करणे शक्य असते. पण धोरणाची अंमलबजावणी ही एक गुंतागुंतीची आणि व्यावहारिक गोष्ट असते. तिचे यश एकाच वेळी अनेक व्यावहारिक स्वरूपाच्या निर्णयांशी निगडित असते; तेथे अनेक स्तरांवरील अनेक व्यक्तींचा प्रत्यक्ष संबंध असतो. यामुळे अंमलबजावणी करताना अनेक अडचणींशी सामना करावा लागतो.

खूप मोठी आव्हाने, येत्या नजीकच्या काळांत, महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्रातील प्रौढ जनता यांना पेलायची आहेत. बालशिक्षणाच्या वयातील (तीन ते आठ वर्ष) मुलांची संख्याही सहजपणे दीड कोटींच्या वर आहे. एवढ्या मोठ्या संख्येच्या लहान मुलांना, शिक्षणात प्रवेश करून द्यायचा आहे. मुलांना आनंदमय वातावरण देऊन, शिकण्याची गोडी लावून, टिकवून ठेवायचे आहे; शिवाय या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची सोय करायची आहे. मुळातच हे संख्येचे आणि शिक्षणदर्जाचे दुहेरी उद्दिष्ट साध्य होणे ही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी शासकीय पातळीवर अत्यंत काटेकोर नियोजन केलेली नेटकी व्यवस्था प्रामाणिकपणे उभी करावी लागेल. शासनाचे सध्याचे शिक्षण खाते, आधीच अवाढव्य झाले असून, त्याला कोट्यवधी मुलांच्या, नव्या विषयातील शास्त्रशुद्ध शिक्षणाला भिडणे, व्यवस्थापन व मूल्यमापन व्यवस्था नव्याने निर्माण करणे, ही बाब पेलणारी नाही. शिवाय बाल शिक्षणाची पायरी ही पाहिली आणि पायाभूत अशी शिक्षणाची पायरी शिक्षण धोरण २०२० मध्ये आहे. त्यामुळे ही पायरी जर 'पायाभूत' ठरायची असेल तर तिच्या

व्यवस्थापनासाठी नवी, स्वतंत्र आणि स्वायत्त अशी यंत्रणा उभी करायला हवी. महाराष्ट्रात १९९४ साली, प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, शासनाने 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती' स्थापन केली होती. तिने दिलेल्या १९९६ सालचा आपल्या अहवालात तज्ज्ञ मंडळींच्या स्वायत्त अशा 'महाराष्ट्र बालशिक्षण मंडळा'ची स्थापना शासनाने करावी अशी एक रास्त सूचना केली होती. तीच सूचना पुन्हा करता येईल. या सूचनेची कार्यवाही झाली तरच, बालशिक्षणाचे स्वरूप 'पायाभूत' शिक्षण असे होऊ शकेल.

सध्या फार मोठ्या प्रमाणात खासगी, मॉन्टेसरी, केजी, नर्सरी अशा प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेंव फुटले आहे. या शाळा स्वयंभू असतात. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नसते, मुलांचे झकपक शिक्षण करून, पैसे ओढण्याचेच हे उद्दिष्ट असलेल्या या शाळा बालशिक्षणाचे कोणते शास्त्र किती प्रमाणात पाळतात, किती प्रमाणात मुलांना औपचारिक लेखन-वाचन-गणनाच्या शिक्षणापासून दूर ठेवतात, वयोमानानुसार समता विकास यांचे किती उपक्रम देतात, सहजशिक्षण, स्वयंशिक्षण यांच्या संधी कितपत देतात, शिक्षिका कोणत्या प्रकारे बालशिक्षणात सुशिक्षित असतात, असे अनेक प्रश्न या शाळांबाबत उपस्थित होतात. त्यांची तपासणी अनिवार्य होण्यासाठी कायदा करावा लागणार आहे.

एकूणच बालशिक्षणाच्या या पायाभूत उत्तराला अपेक्षित महत्त्व प्राप्त व्हायचे असेल तर, मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद शासनाकडून होणे अपेक्षित आहे. निदान, शालेय शिक्षणावर होणाऱ्या आर्थिक तरतुदींमधील पन्नास टक्के वाटा या मूलभूत स्तरावर व्हावा लागेल. खूप मोठी भांडवली खर्चाची तरतूदही व्हावी लागेल. यांमध्येसुद्धा अंगणवाड्यांना प्राधान्य द्यावे लागेल.

बालशिक्षणाचे क्षेत्र हे सुरुवातीचे आणि पायाभूत शिक्षण तर आहेत पण, त्याचबरोबर ते शास्त्रोक्त म्हणजे 'मेंदू आधारित शिक्षण' असावे लागेल. या पातळीवरील शिक्षणाची पद्धत 'अनुभवांधारित ज्ञानप्राप्ती'ची असायला हवी. तरच या शिक्षणाच्या मांडवाखालून गेलेल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा लाभ होऊ शकेल. बालशिक्षण हा समाजसुधारणेचा एक महत्त्वाचा पैलू आहे आणि राष्ट्रउभारणीचा तो बळकट पाया आहे. त्यामुळे बालशिक्षण ही गांभीर्याने घेण्याची गोष्ट आहे. हे आपण आपल्या मनांतून रुजवू या.

❖